श्री. जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-यांची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-आस्था/३/५५२३/१५०/२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/०२/२०२५

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५५२३/१६०७/२०२३ दिनांक १८/१२/२०२३
२. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/५५२३/९३७/२०२४ दिनांक १३/११/२०२४
३. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था/५२३/२०२४ दिनांक १६/१२/२०२४ समवेत दोषारोप पत्र बजावले बाबत पोहोच
४. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा. विभाग जामखेड यांचेकडील पत्र क्र.लपा/आस्था/४७/२०२४ दिनांक ०३/०२/२०२५ समवेत श्री जाधव यांनी सादर केलेला खुलासा
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. जाधव संतोष बाळसाहेब, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे जि.प.सा.बा दक्षिण विभाग, अहिल्यानगर येथे कार्यरत असताना बांधकाम विभागाकडील कामकाजात अनियमितता करुन जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेने संदर्भ क्रमांक १ अन्वये श्री जाधव यांना जिल्हा परिषद सेवेतुन सेवा सेवानिलंबीत करणेत आलेले आहे. संदर्भ क्र.२ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री .जाधव यांना संदर्भ क्र. ३ अन्वये बजाविण्यात आलेले आले. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये श्री जाधव यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप श्री जाधव यांनी अमान्य केलेले आहेत.

तरी श्री जाधव यांचे विरुध्द चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. संभाजी आण्णासाहेब जरे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प.साबा उत्तर विभाग, अहिल्यानगर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

परिशिष्ट क्र तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202502280400२९ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 28-02-2025 10:51:02
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

..२

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी) नाशिक विभाग, नाशिक. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री. संभाजी आण्णासाहेब जरे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प.साबा उत्तर विभाग, अहिल्यानगर व्दारा व प्रत- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा उत्तर विभाग अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत **संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र. १ ते**

३. श्री. जाधव संतोष बाळासाहेब, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
व्दारा :- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प.लपा.उपविभाग जामखेड
२/- सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी /--
(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर